आकाशवाणी नागपूर,

प्रादेशिक वृत्त विभाग

प्रादेशिक बातम्या (मराठी – वेळ सायंकाळी 06.40)

मंगळवार दिनांक 27 जून 2017

काही ठळक बातम्या ..........................

1. पंतप्रधान श्री मोदी आणि अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष श्री डोनाल्ड ट्रम्प यांच्यात महत्वपूर्ण चर्चा; सरहद्दीपलिकडून दहशतवादी हल्ले करण्यासाठी पाकिस्ताननं आपल्या भूमीचा वापर करू देऊ नये, असं भारत आणि अमेरिकेतर्फे संयुक्त आवाहन.
2. समाजातील वंचित आणि दुर्बल घटकांना मुख्य प्रवाहात आणण्याच्या उद्देशानं राज्य सरकार प्रयत्नशील असून, त्यासाठी नव्या योजना कार्यान्वित करण्यात आल्या असल्याचं जिल्ह्याचे पालकमंत्री श्री चंद्रशेखर बावनकुळे यांचं प्रतिपादन.
3. अमेरिकेत संपन्न झालेल्या 'रेस एक्रॉस अमेरिका' या सायकल स्पर्धेत नाशिकच्या डॉ. श्रीनिवास गोकुळनाथ यांचा वैयक्तिक विक्रम; तर नागपूरच्या डॉ. अमित समर्थ यांचाही विजेत्यांमध्ये समावेश.

आणि

4. मुंबई, कोकण आणि पश्चिम महाराष्ट्रासह विदर्भातही मोसमी पर्जन्यराज सक्रिय असून, गेल्या चोवीस तासात विदर्भात अनेक ठिकाणी पेरणीसाठी अनुकूल पावसाची नोंद.

**********

सरहद्दीपलिकडून दहशतवादी हल्ले करण्यासाठी पाकिस्ताननं आपल्या भूमीचा वापर करू देऊ नये, असं संयुक्त आवाहन भारत आणि अमेरिकेतर्फे करण्यात आलं आहे. दहशतवादाचं समूळ उच्चाटन करण्यासाठी उभय देश कटिबद्ध असल्याचं एका संयुक्त पत्रकाद्वारे सांगण्यात आलं. पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी आणि अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष श्री डोनाल्ड ट्रम्प यांच्यात झालेल्या चर्चेनंतर 26/11 च्या मुंबई, तसंच, पठाणकोट दहशतवादी हल्लेखोरांवर त्वरित कठोर कारवाई करण्याची मागणी देखील करण्यात आली.

मोठ्या प्रमाणात हत्याकांड घडवून आणण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या शस्त्रास्त्रांच्या देवाणघेवाण आणि वापरावर प्रतिबंध घालण्याच्या दृष्टीनं एकत्रित प्रयत्न करण्याच्या निर्धाराचा देखील यावेळी उभय नेत्यांकडून पुनरूच्चार करण्यात आला.

उभय नेत्यांच्या चर्चेनंतर बोलताना विदेश सचिव श्री एस. जयशंकर म्हणाले, की विविध दहशतवादी संघटना जसे इसिस, अल्–कायदा आणि जैश–ए–मोहम्मद यांच्या कारवायांना आळा घालण्यासाठी सहकार्य वाढविण्यावर देखील यावेळी भर देण्यात आला.

तत्पूर्वी, पंतप्रधान श्री मोदी यांनी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष श्री डोनाल्ड ट्रम्प यांना परिवारासहित भारत भेटीचं आमंत्रण दिलं.
दरम्यान, पंतप्रधान तीन देशांच्या दौऱ्यातील अंतिम टप्प्यात नेदरलँडची राजधानी ॲमस्टरडॅम इथं पोहचले. तिथं श्री मोदी नेदरलँडचे पंतप्रधान श्री मार्क रूट यांच्यासोबत तापमान बदल आणि दहशतवाद विरोध या जागतिक महत्वाच्या मुद्यांवर चर्चा करतील.

**********

अमेरिकेनं पाकिस्तानातील दहशतवादी संघटना, हिजबुल मुजाहिद्दीनचा प्रमुख सय्यद सलाहुद्दीन याला आंतरराष्ट्रीय दहशतवादी म्हणून घोषित केलं आहे. पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी आणि अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष श्री डोनाल्ड ट्रम्प यांच्या भेटीपूर्वी अमेरिकेच्या परराष्ट्र विभागानं ही घोषणा केली असून, या निर्णयाचं भारतानं स्वागत केलं आहे. गेल्या काही दिवसांपूर्वी पठाणकोट हल्ला हा आमच्या कारवायांचा भाग असल्याचं सांगत सय्यद सलाहुद्दीन यानं या हल्ल्याची जबाबदारी जाहीरपणं स्वीकारली होती.

**********

राष्ट्रपतीपदाची निवडणूक दोन दलित उमेदवारांमध्ये होत असल्याचा समज श्रीमती मीराकुमार यांनी फेटाळला आहे. संयुक्त पुरोगामी आघाडीच्या श्रीमती मीराकुमार ह्या राष्ट्रपतीपदाच्या उमेदवार आहे. माजी लोकसभा अध्यक्ष असलेल्या श्रीमती मीरा कुमार म्हणाल्या की, जाती आधारित व्यवस्था आणि राजकारण बंद झालं पाहिजे.

**********

उत्पन्नाच्या स्त्रोतावरील कर वजावट म्हणजे टी.डी.एस. आणि स्त्रोतांवरील कर संग्रह म्हणजे टी.सी.एस. ची अंमलबजावणी सध्या स्थगित करण्यात आली आहे. एक जुलैपासून अंमलात येणाऱ्या जीएसटी प्रणालीची कार्यवाही सुरळीत झाल्यानंतर या संबंधीचा निर्णय जाहीर करण्यात येईल, असं अर्थमंत्रालयानं म्हटलं आहे.

**********

हिमालयातील पवित्र अमरनाथयात्रेकरिता येणारे भाविक आणि सेवा पुरवठादारांना देण्यात येणारी सामुहिक विमा संरक्षण रक्कम एक लक्षावरून तीन लक्ष रूपये करण्यात आल्याची घोषणा श्री अमरनाथ यात्रा मंडळाचे अध्यक्ष आणि जम्मू-काश्मीरचे राज्यपाल श्री एन. एन. व्होरा यांनी आज केली. येत्या गुरूवार पासून ही यात्रा सुरु होत आहे.

**********

सामाजिक क्रांतीचे प्रणेते आणि थोर समाजसुधारक राजर्षी शाहू महाराजांची जयंती काल नागपुरातही सामाजिक न्याय दिन म्हणून साजरी करण्यात आली. समाजातील वंचित आणि दुर्बल घटकांना मुख्य प्रवाहात आणण्याच्या उद्देशानं राज्य सरकार प्रयत्नशील असून, त्यासाठी नव्या संकल्पना आणि कल्याणकारी योजना कार्यान्वित करण्यात आल्या असल्याचं प्रतिपादन जिल्ह्याचे पालकमंत्री श्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केलं. सामाजिक न्याय आणि विशेष साहाय्य विभागाच्या वतीनं डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहात आयोजित कार्यक्रमात ते काल बोलत होते.
मागासवर्गीय शासकीय वसतिगृहातील इयत्ता दहावी आणि बारावीच्या प्राविण्यप्राप्त विद्यार्थ्यांचा या समारंभात गौरव करण्यात आला. राजर्षी शाहू महाराज गुणवत्ता पुरस्कारांच्या धनादेशांचं वितरण, तसंच, बचत गटांना मिनी ट्रक्टर, रमाई आवास घरकुल योजना आणि लोकशाहीर अण्णाभाऊ साठे महामंडळाच्या कर्जांच्या धनादेशांचं वितरण देखील यावेळी करण्यात आलं.
खासदार डॉ. विकास महात्मे, आमदार डॉ. मिलिंद माने, जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष श्री शरद डोणेकर आणि मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. कादंबरी बलकवडे यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.

**********

देशभरातील नद्यांच्या माध्यमातून वाहतूक आणि पर्यटनाला प्रोत्साहन देण्याचं लक्ष्य केंद्र सरकारनं ठेवलं असल्याची माहिती, केंद्रीय रस्ते, महामार्ग आणि नौवहन मंत्री श्री नितीन गडकरी यांनी दिली. देशात उच्च सुविधायुक्त जलपर्यटन विकसित करण्याच्या आराखड्याबाबत श्री गडकरी बोलत होते. आग्नेय आशियातील देशांसोबत व्यापार आणि पर्यटन वृद्धिंगत करण्यात ब्रह्मपुत्रा नदी अत्यंत महत्वाची असल्याचंही त्यांनी यावेळी बोलताना सांगितलं.

**********

सरकारी योजनांच्या लाभार्थ्यांना आधार कार्ड अनिवार्य करणाऱ्या सरकारी अधिसूचनेला अंतरिम स्थगिती द्यायला सर्वोच्च न्यायालयानं आज नकार दिला. न्यायमूर्ती ए. एम. खानविलकर आणि न्यायमूर्ती श्री नवीन सिन्हा यांच्या सुट्टीकालीन पीठानं हा आदेश दिला. ‘आधार’ च्या घटनात्मकतेबाबत प्रकरण न्यायप्रविष्ट असून, केवळ सरकारी योजनांचा लाभ आधार अभावी हिरावून घेतला जाईल या भितीपोटी या अधिसूचनेला तात्पुरती स्थगिती देता येणार नाही, असं न्यायालयानं स्पष्ट केलं. आधार सादर करण्याची मुदत केंद्र सरकारनं ३० जूनपासून ३० सप्टेंबरपर्यंत वाढवली असल्याचं सरकारी वकील श्री तुषार मेहता यांनी सांगितलं. या प्रकरणी पुढील सुनावणी सात जुलैला होणार आहे.

**********

अमेरिकेत संपन्न झालेल्या चार हजार नऊशे किलोमीटरच्या ‘रेस एक्रॉस अमेरिका’ या सायकल या स्पर्धेत सातवा क्रमांक प्राप्त करीत नाशिकच्या डॉ. श्रीनिवास गोकुळनाथ यांनी वैयक्तिक गटात इतिहास नोंदवला. जगातील सर्वात कठीण आणि आव्हानात्मक समजली जाणारी ही सायकल स्पर्धा पूर्ण करणारे ते पहिले भारतीय सायकलपटू ठरले आहेत. हे अंतर त्यांनी अकरा दिवस अठरा तास पंचेचाळीस मिनिटात पूर्ण केलं. ही स्पर्धा केवळ नऊ खेळाडूंनी पूर्ण केली आहे.
याच स्पर्धेत नागपूरच्या डॉ. अमित समर्थ यांनी आठवा क्रमांक पटकावला आहे. डॉ. समर्थ यांनी ही स्पर्धा अकरा दिवस 21 तास आणि 11 मिनिटांत यशस्वीपणे पूर्ण केली. कडव्या आव्हानांचा सामना करीत डॉ. अमित समर्थ यांनी पहिल्याच प्रयत्नात जगातील ही सर्वात कठीण स्पर्धा पूर्ण केली.
सायकलपटूंसाठी अत्यंत आव्हानात्मक मानली जाणारी ही शर्यत बारा दिवसात पूर्ण करण्याची अट होती. शर्यतीचा मार्ग खडतर आणि डोंगराळ परिसरातून असून, अमेरिकेच्या पूर्व भागातून प्रारंभ झालेली ही शर्यत पश्चिमेकडं समाप्त झाली. यात स्पर्धकाला निश्चित दिवशी स्पर्धा समाप्त करण्याकरिता दररोज चारशे किलोमीटरपेक्षा अधिक अंतर पार करावं लागतं.

**********

जर्मनीमध्ये आंतरराष्ट्रीय नेमबाजी संघटना महासंघाच्या वतीनं आयोजित कनिष्ठ नेमबाजी अजिंक्यपद स्पर्धेत भारताच्या अनिश, अनहद आणि शिवम् शुक्ला या तिघांनी 25 मीटर रॅपिड फायर पिस्तुल गटाअंतर्गत एकत्रितपणं एक हजार सातशे अकरा गुण प्राप्त करीत या स्पर्धेतील कांस्यपदक पटकावलं. यामुळं पदक तालिकेत दोन सुवर्ण, एक रजत आणि एका कांस्य पदकासह भारत तृतीय स्थानावर आहे.

**********

मुंबई, कोकण आणि पश्चिम महाराष्ट्रासह विदर्भातही मोसमी पर्जन्यराज सक्रिय असून, गेल्या चोवीस तासात विदर्भात अनेक ठिकाणी मध्यम ते जोरदार स्वरूपाच्या सरींनी पर्जन्यवृष्टी केली. पावसाच्या प्रमुख नोंदी अशा आहेत – कारंजा इथं दहा, सेलू इथं नऊ, कळमेश्वर इथं आठ, तर राळेगाव, वर्धा, भामरागड आणि मूलचेरा इथं प्रत्येकी सहा सेंटिमीटर. तसंच, भिवापूर, सावनेर, आष्टी, आर्वी, एटापल्ली, चिमूर, मूल, आर्णी, बाभुळगाव आणि नांदुरा इथं प्रत्येकी पाच, नागपूर, हिंगणघाट, गडचिरोली, सावली, पोंभुर्णा, गडचिरोली, चंद्रपूर, पुसद, दिग्रस, रिसोड, मेहकर आणि

बार्शीटाकळी इथं प्रत्येकी चार, तर नरखेड, हिंगणा, समुद्रपूर, देवळी, अहेरी, आरमोरी, चामोर्शी, धानोरा, सिंदेवाही, पवनी, कळंब, वाशिम, शेगाव आणि चांदूररेल्वे इथं प्रत्येकी तीन सेंटिमीटर. याशिवाय, आणखी काही ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरूपाची पर्जन्यवृष्टी नोंदविण्यात आली.

दरम्यान, नागपुरात आज सकाळपासून मध्यम ते जोरदार स्वरूपाच्या सरींच्या माध्यमातून दमदार पर्जन्यवृष्टी झाली. सायंकाळी साडेपाच वाजेपर्यंत शहरात 112 मिलिमीटर पावसाची नोंद करण्यात आली.

आगामी 48 तासात विदर्भात अनेक ठिकाणी मेघगर्जनेसह पर्जन्यवृष्टी आणि काही ठिकाणी जोरदार वृष्टी होण्याचा इशारा प्रादेशिक हवामान केंद्राच्या सूत्रांनी दिला आहे.

**********

मराठी नाटक आणि सिनेमांच्या 250 रूपयांच्या तिकीटांसाठी असलेली सवलतीची मर्यादा 500 रूपयांपर्यंतच्या तिकीटांसाठी करण्याच्या मागणीसाठी केंद्र सरकारकडं पाठपुरावा करण्याचे आश्वासन वित्तमंत्री श्री सुधीर मुनगंटीवार यांनी मुंबई इथं केलं.

**********

इयत्ता अकरावी ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेसाठी नाव नोंदणी आणि प्रवेश अर्ज भरण्यासाठीची मुदत दोन दिवसांसाठी वाढविण्यात आली असून, विद्यार्थ्यांना आता 29 जून संध्याकाळी पाच वाजेपर्यंत अर्ज करण्याची परवानगी देण्यात आली आहे. मुंबई, अमरावती, तसंच, अन्य विभागांमध्ये सर्व विद्यार्थ्यांना प्रवेशाकरिता सोयीचं व्हावं याकरिता हा निर्णय घेण्यात आला आहे.

**********

The End